SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX 0231-260900, 2609185 थेट : 2609317, 2609110
FAX : 0091-0231-2690655,2691533 o 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in
E-mail : cap@unishivaji.ac.in

Estd: 1962
NAAC 'A' Grade

**Ref. No. SU/Exam/CAP/1164** **Date :27/02/2019**

- 5 MAR 2019

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालय परिसंस्था
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

विषय :- मार्च/एप्रिल, २०१९ विद्यापीठ परीक्षेपासून परीक्षार्थीच्या उत्तरपत्रिकेची गोपनियता राखणेचे दृष्टीने मास्किंग स्टीकर महाविद्यालय परीक्षा केंद्रावर लावणेबाबत.

महोदय/महोदया,

याव्दारे आपणास अवगत करण्यात येते की, मार्च/एप्रिल, २०१९ विद्यापीठ उन्हाळी परीक्षेपासून परीक्षार्थीच्या उत्तरपत्रिकेची गोपनियता राखणेचे दृष्टीने उत्तरपत्रिकेवर लावण्यात येणारे मास्किंग स्टीकर महाविद्यालय परीक्षा केंद्रावर लावणेबाबत प्रशासकीय निर्णय घेणेत आला आहे. या संदर्भातील सविस्तर कार्यपध्दती तसेच मार्गदर्शकपर सूचना सोबत जोडण्यात आल्या आहेत.

तरी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ८९ प्रमाणे विहीत मुदतीत जाहीर करणेचे दृष्टीने घेण्यात आलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत आपल्या परीक्षा केंद्रावरील सर्व संबंधित घटकांना सूचना द्याव्यात, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत :- वरीलप्रमाणे

# मास्किंग स्टीकर्स वापराबाबत मार्गदर्शनपर सुचना

1. विद्यापीठाकडून मास्किंग स्टीकर्स परीक्षार्थींच्या संख्येनुरूप प्रत्येक महाविद्यालयास मोफत पुरविण्यात येतील यासाठी कोणतेही अतिरीक्त शुल्क आकारण्यात येणार नाही.
2. विद्यापीठाकडून प्राप्त स्टीकर्स महाविद्यालय स्तरावर अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक यांनी ताब्यात घेवून तशी पोहोच देण्यात यावी.
3. सदर मास्किंग स्टीकर्स परीक्षा सुरू होण्यापूर्वी ताब्यात दिल्या जाणा-या को-या उत्तरपत्रिका सोबत कनिष्ठ पर्यवेक्षकांच्या ताब्यात देण्यात याव्यात.
4. कनिष्ठ पर्यवेक्षकांनी परीक्षार्थींना उत्तरपत्रिका वाटप करतेवेळी मास्किंग स्टीकर्स प्रत्येकी एक प्रमाणे परीक्षार्थींना वाटप करणेबाबत वरिष्ठ पर्यवेक्षकांनी सूचना कराव्यात.
5. परीक्षार्थीनी बैठक क्रमांकाची अचूक नोंद केलेबाबत खात्री करून कनिष्ठ पर्यवेक्षकांनी सही केल्यानंतरच परीक्षार्थींनी स्टीकर्स उत्तरपत्रिकेच्या उजव्या कोप-यात व्यवस्थितपणे लावणेबाबत सूचना कराव्यात.
6. पेपरची वेळ संपलेनंतर कनिष्ठ पर्यवेक्षक यांचेकडून पेपर जमा करून घेतेवेळी वरिष्ठ पर्यवेक्षक यांनी प्रत्येक परीक्षार्थीनी व्यवस्थितरित्या मास्किंग स्टीकर्स लावला असलेबाबतची खातरजमा करावी.
7. प्राथमिक टप्प्यात महाविद्यालयास पुरविण्यात आलेली मास्किंग स्टीकर्स खराब झालेस अथवा अपुरे पडलेस तात्काळ उपकुलसचिव, मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे लेखी मागणी करावी.
8. मास्किंग स्टीकर्स न लावता कोणत्याही उत्तरपत्रिका मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर जमा करून घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
9. स्टीकर वापरलेबाबतची नोंद उत्तरपत्रिकाप्रमाणेच स्वतंत्र नोंदवही ठेवून करावी कोणत्याही परिस्थितीत मास्किंग स्टीकरचा गैरवापर, अयोग्य कृतीने खराब होणार नाही याची दक्षता घ्यावी.
10. सदरचे पुरविण्यात येणारे मास्किंग स्टीकर्स हे विद्यापीठ व महाविद्यालय संयुक्तपणे राबविणेत येत असलेल्या प्रथम वर्षाच्या परीक्षा वगळून अन्य परीक्षेसाठीच्या परीक्षार्थीसाठी पुरविण्यात येत आहेत. तेंव्हा सदर स्टीकर्स प्रथम वर्षाच्या उत्तरपत्रिकांसाठी वापरण्यात येवू नये.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ